Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2502I01S01V13P0008

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'25
Issue–II(I), Volume–XIII

# लोकसाहित्य झाडीपट्टीतील विवाहगीते एक अभ्यास

डॉ. बळीराम राऊत (सहयोगी प्राध्यापक)
जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड
जि. नागपूर – Pin No: 4412103
Mob : 9767278720/9356229389
Email : baliramraut37@gmail.com

**सारांशः–**

लोकसाहित्यात विविध विषयांचा अंर्तभाव असून ग्रामीण जीवनशैलीतून विविध विषय लोकसाहित्यात प्रकर्षाने आले आहेत. विशेषत्वाने लोकसाहित्यात लोकजीवनाचा आविष्कार बघावयास मिळतो. या साहित्य प्रकारात स्त्रियांची गाणी प्रसिद्ध आहेत. त्यापैकीच विवाहगीते हा त्यातील भाग आहे. विवाह गीते म्हणजे धार्मीक विधी व दंडके पार पांडतांना स्वच्छ मनाच्या अर्विभावातून स्त्रीमनाने गायिलेली हिंदू समाजाच्या उत्सवाचे वर्णन होय. याविवाह गीतातून प्राचीन काळापासून स्त्रीया परंपरा जपत आपल्या मनातील सुखदु:ख, भावभावना दंडकाच्या निमित्याने व्यक्त करून त्यातूनच विवाह गीताची निर्मिती झाली.

भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदीया जिल्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या आपल्या बोली भाषेत अशिक्षित स्त्रीसमुहाने परंपरागत मौखिकरित्या जपलेली विधीविषयक विवाहगीते कालौघात लुप्त होऊ नये व ते लिपीबद्ध व्हावे या दृष्टीने विवाहगीतांचा अभ्यास महत्तवांचा वाटतो.

**मुख्यशब्दः–** झाडीपट्टी, विवाहगीते

महाराष्ट्र हे असामान्य थोर रत्नांची पावनभूमी आहे. याच पावनभूमीतून अनेक थोर नररत्न जन्मास आले. जगाच्या पाठीवर या राष्ट्राची संस्कृती भव्य नी उदात्त आहे. इथल्या संस्कृतीला मांगल्यादिक पवित्र असा सुवास आहे. इथल्या संस्कृतिचा ज्ञानात्मक परिमळ संपूर्ण जगतात पसरलेला आहे. भव्यनी उदात्त जीवन मूल्याचे अधिष्ठान संस्कृतीला लाभले आहे आणि म्हणून अनेक पाश्चिमात्य अभ्यासक – विचारवंत वैविध्यपूर्ण तथा ज्ञानसंपन्न संस्कृतिचा अभ्यास करण्यासाठी इथे ठाण मांडून चिकित्सक अभ्यास करण्यासाठी येतात. ही संस्कृतिच्या गौरवाची गोष्ट आहे.

इथे विरत्व, वैराग्याच्या परंपरा एकत्र नांदत आहे. भावना आणि विचारांचे प्रवाह समाजजीवनाच्या ज्ञान सरितेतून प्रवाहित झाले आहेत. लोकसंस्कृती, लोकमानस आणि लोक जीवनातील ज्ञानगंगेने संपन्नता प्राप्त करून दिले आहे. दुरितांचे तिमीर नष्ठ करून ज्ञानाची पव्हे याच भूमीत उघडण्यात आले. अनेक विद्यवान साहित्यिक विचारवंत, कवीच्या अस्त्विाने या भूमीची कूस धन्य झाली आहे. लोकजीवनातून विचाराचा झरा अखंड प्रवाहित आहे. अनेक विचारवंताच्या मुशीतून रोज एक नवे साहित्य जन्मास येत आहे. हे साहित्य मानवी जीवनाला ज्ञानसंपन्न व विकासाकडे नेत आहे. विवाहगीत व लोकसाहित्याचे महत्वाचे एक अंग आहे. आजवर लोकसाहित्याने अनेक अलिखित साहित्याला शोधून मुर्त रूप देण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसाहित्य हे मानवी जीवनाचा आरसा आहे. परंपरेन जपत आलेले ग्रामीण पण अलिखित मौलिक साहित्य कालौघात नष्ट होऊ नये म्हणून व झाडीपट्टीतील विवाहगीते लोकसाहित्याच एक महत्वाचे अंग आहे. हे ग्रामीण निरक्षराचे साहित्य संपुष्टात येऊ नये यादृष्टीने भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण स्त्रीयांच्या उत्सवा प्रसंगी सहजतेने काही गाणी गायिली जातात. ही गाणी दंडक निमित्य येतात. ही गाणी लोकसाहित्य

प्रकारातील असून कालौघात संपुष्ठात येऊ नये त्यासाठी त्यांचे संकलन व लिपिबद्ध करणे, क्रम प्राप्त करणे. ही गाणी व त्याचे महत्व पुढील पिढीला ज्ञात करून देणे त्याचे जतन करणे महत्वाचे वाटले.

'विवाहगीते' हे लोकसाहित्य संस्कृतीचा एक महत्वपूर्ण भाग आहे. लोकसाहित्य संमिश्र व गुंतागुतीचे आहे. लोकसाहित्य हे लोकांचे व लोकांनिच निर्माण केलेले असते. लोकसाहित्य संपूर्ण मानव जातीला आपल्या कवते सामावून घेते. ग्रामीण समाज हा अडाणी व काहिसा सुंसस्कृत,परंतु नागर संस्कृतीच्या दूर असतो. तो परंपरागत जीवन जगतो. ह्या समाजाचे पारंपारिक एक विशिष्ट असे वैशिष्ट्ये आहे. त्यांना स्वत:च्या सांस्कृतीक परंपरा माहित असतात व ते पारंपारीक जीवन जगत असतात. त्यांच्या समाजाची परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वारसाहक्काने जाते.

लोकसाहित्य हे एका व्यक्तिचे कधीही नसते. तर ते सामुहिक जीवनाच अविष्कार व प्रकटीकरण असते. संस्कृती, समाज, धर्म, भाषा याचा अमुल्य ठेवा असतो. लोकसाहित्यातून लोकांच्या जीवनातील स्वप्ने, कल्पना, भावभावना आशा, इच्छा, व्यक्त होतांत. माणसांच्या रूढी, परंपरा जीवनविषयक सवयी यातून प्रकट होतात. एखाद्या समाजाची व्यावसायिक सामुग्री, अनुभव यातून नवनिर्मित साहित्य आकारास येते. कल्पनाशक्ती, विचारांची घुसळण श्रमरिहार, यातून लोक उत्सफूर्तपणे साहित्य निर्माण करतात. तेच लोकसाहित्य होय.

'विवाहगीते' गाण्याची परंपरा ही महदंबेंच्या धवळे पासून झाली असावी असे अभ्यासंकाचे मत आहे. हिच पारंपारिक परंपरा आजही समाजात मौखिक परंपरेने चालत आलेली आहे. ती लुप्तप्राय होऊ नये, त्यांना अमरत्व देणे लोकसाहित्याच्या दृष्टीने महत्वाचे वाटते. आजही भंडरा, चंद्रपूर व गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात विवाह प्रसंगी स्त्रीया विवाहपसंगी विवाहगीते गातांना दिसतात. हि विवाह गीते – विधी व दंडकाच्या अनुषंगाने सामुहिकपणे गातांना दिसतात. म्हणजे आजही हे अंलंकारिक लोकसाहित्याचा अमोल ठेवा या जिल्यातील ग्रामीण भागात जपले जात आहे. ह्या विवाह गितांना अमरत्व प्राप्त करून देणे साहित्या दृष्टीने महत्वाचे वाटते.

**<u>लोसाहित्यातील विवाहगीते:–</u>**

भारतीय संस्कृतीत एक महत्वाचा मंगलविधी किंवा धार्मिकविधी म्हणजे विविहसोहळा समजला जातो. झाडीपट्टीतील या विवाहगीतांना लोकगीतांमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. विवाहविधीचे स्वरूप धार्मीकविधीचे असल्याने धर्म–विधी पार पाडल्याचे समाधान होते. व्यक्तीच्या जीवनात विधीचे स्थान महत्वाचे आहे. धर्मजीवनातील बहूतांश विवाह सोहळ्यातील आनंदाने उत्साहाने, दंडकाच्या प्रसंगी स्त्रीया गजराच्या, वाद्यांच्या गजरात विवाहगीते सामुहिक पध्दतीने गातात म्हणुनच लोकगीते किंवा विवाहगीते हे स्त्रीयांचीच गीते संबोधल्या जाते.

प्राचीन काळी स्त्रीयांना मनोरंजनासाठी व्यासपीठ अस्तित्वात नव्हते. अशावेळी स्त्रीया मोठ्या उत्साहाने विवाह सोहळयात विवाहगीते सादर करीत आजघडीला फार कमी प्रामाणात व्यासपीठ अस्तित्वात आहेत. म्हणून बहुतांश प्रमाणात विवाहगीते कमी प्रमाणात गातांना दिसतात. शहरी भागात तर त्याचे प्रमाण नगण्यच आहे. सामुहिक विवाह पद्धत, न्यायिक विवाह पद्धती सुरू झाल्यामुळे एक–दोन दिवसातच विवाह साहेळा आजकल संपन्न होतो. त्यामुळे आजच्या नवतरूण पिढीला एक तर विवाहगीत मुखोद्‌गत नाहीत किंवा असल्यास त्यांना गायला संकोच वाटतो. त्यामुळे विवाहगीते आजधडीला संपुष्ठात येतील की काय? असा प्रश्न पडतो.

आधुनिक काळात विवाहगीतांच्या जागा चित्रपटगीतांनी घेतली आहे. त्यामुळे ही गाणी ध्वनीक्षेपकांवर वाजविल्याचे चित्र बघावयास मिळते. ही विवाहगीते नव्या पिढीकडून नष्ठ होऊ नयेत अशी भिती निर्माण झाली. त्यामुळे त्यांचे संकलन व जतन करणे लोकसाहित्याच्या दृष्टीने महत्वाचे ठरते.

विवाह सोहळे हे प्राचीन व मध्यंतरीच्या काळात चार–पाच दिवस संपन्न होत असत. या धार्मिक विधी प्रसंगाच्या वेळी स्त्रीया आपले दु:ख, आनंद यामाध्यमातून प्रगट करीत असत. त्यांच्यासाठी आपल्या मनात दाटलेल्या भावना मोकळे करण्याचे ते एक सामुहिक धार्मिक व्यासपीठ होते. प्रत्येक विधी प्रसंगात वेगवेगळया आशयाचे गीते स्त्रीया सादर करीत. प्रत्येक विधी प्रसंगाला

https://doi.org/10.69758/GIMRJ/2502I01S01V13P0008
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'25
Issue–II(I), Volume–XIII

महत्वाचे विशेष स्थान होते. आज 'माय' या विवाह गीतांवर पाश्चिमात्य संस्कृतिचाही प्रभाव दिसतो. विवाह सोहळयाचे चित्रच आता बदलत आहे. जुन्या पिढीतील स्त्रीया ह्या कौटुंबिक होत्या तर आजच्या स्त्रीया व्यावहारिक झाल्या आहेत. वेळेचे महत्व त्यांना समजले आहे. त्यामुळे विवाहगीते गाण्यासाठी त्या समोर येतांना दिसत नाही. एकंदरीत आजच्या परिस्थितीत विवाहगीतांना आहोटीच लागलेली दिसत आहे. पाश्मिात्य संस्कृतिच्या प्रभावामुळे आपल्या धार्मिक प्रथा–परंपरा, रूढी यांचा विसर नव्या पिढीला झालेला दिसतो. शिवाय आपल्या लोकमानस व लोकसंस्कृतीचा विसर पडत चाललेला दिसतो.

**लोकसाहित्यातील लोक गीताचे प्रकार:–**

१) विधीगीते २) श्रमगीते ३) उत्सवगीते ४) उपासनागीते
५) बालगीते ६) शौर्यगीते ७) प्रेम गीते ८) नृत्यगीते

**विवाहगीताचे स्वरूप:–**

विवाहगीते ही विधीप्रधान आहेत. विवाहप्रसंगी वेगवेळ्या विधी किंवा दंडके असतात त्या प्रसंगी ही गीते गायली जातात.

**१) मंडप सजवणूक**

ज्या घरी/कुटूंबात नवरदेव अथवा नवरी तयार करतांना त्या प्रसंगी मंडप व नवरदेवाला उद्देशून गीते गायली जातात.

**२) फर टाकणे – याप्रसंगी विवाह गीते**

फर टाकू आलं बाई, कोण्या गावचं राज।
त्याच्या खासुऱ्यालं,कायेचा साज।।
त्याच्या खासुऱ्यालं आहे पळद्याचा साज।
त्याच्या खासुऱ्यालं चांदीचा आवयेना।।

**३) अईग – याप्रसंगी विवाह गीते**

फर टाकूआलं बाई, कोण्या गावचं राज।
त्याच्या खासुऱ्यालं,कायेचा साज।।
त्याच्या खासुऱ्यालं आहे पळद्याचा साज।
त्याच्या खासुऱ्यालं चांदीचा आवयेना।।

**४) नवरदेव उभा करणे –** ज्यांचे घरी–कुटूंबात विवाह आहे व जो नवरा मुलगा आहे. नवरदेव करतांना त्यास सजवितांनाचे प्रसंगी विवाह गीत

मालीदादा काय करेते।
नवऱ्या बापूची दाढी घोटते।।
मालीदादा काय करते।
पाठची बयनायी केस धरते।।

**५) तेलमालाचे गीत ६) हळद गीत ७) अगेरी जाळणे**
**८) मांडव सुतावणे ९) गयरव १०) दिवा नेणे**
**११) कांजन हांडी १२) गृहप्रवेश १३) वरात**

https://doi.org/10.69758/GIMRJ/2502I01S01V13P0008

वरील विधीच्या वेळी प्रसंगानुरूप विवाहगीतांचे सादरीकरण बहुसंख्य स्त्रीया सामुहिक पद्धतीने तालासुरात विवाहगीते सादर करतात तसेच वरील विधी—विवाहगीतातून लोकमानसाचा आविष्कार, झिरपतांना दिसतो. इत्यादीची माहिती विवाहगीतातून प्राप्त होते. हिंदू समाजातील विधी/दंडके/आचार—विचाराचा लक्षात येतात. शिवाय लोकदेवता व त्यांची उपासना, सामाजिक जिवनविषय दृष्टीकोण, सामाजिक परंपरा, श्रद्धा, इहवाद व दैववाद धारा लक्षात येते.

समाज जीवनावर प्राचिनत्तम धारेचा प्रभाव असल्यामुळे भागवत धर्म, मराठी संताच्या उपदेशाचा प्रभाव पंढरीच्या पांडुरंगाचे आकर्षण त्यांच्या काव्यात बहुवंश ठिकाणी प्रत्ययास येतो.

<u>विवाहगीतातून दिसणारे वाङ्:मयीन वैशिष्टये</u>

१) विवाहगीतातून लोकजीवनाचा आविष्कार सतत जाणवतो.
२) विवाहगीताचे स्वरूप बदलत असते. त्यामुळे विवाहगीते जुनेही आणि नवेही नसते. नव्यावर जुन्याची कलम बांधण्याची प्रक्रिया विवाहगीतात आढळून येते.
३) विवाहगीत गाणारा प्रत्येक गायका/गायिका त्यात आपले नवे शब्द घालित असतो. त्यामुळे आशय हा परंपरागत असला तरी नव्या प्रेरणांना अनुसरून नवीन स्वरूपात अभिव्यक्त होतो.
४) विवाहगीताचे स्वरूप प्रवाही असते.
५) विवाहगीताचे मुळ एक असूनही निरनिराळ्या भाषेत त्याचे स्वरूप भिन्न असते.
६) विवाहगीतातून लोकजीवनाची अभिव्यक्ती होते.
७) विवाहगीते मौखिक स्वरूपाचे असून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते.
८) सौदर्य, भावना, नीतितत्वे, तत्वज्ञान व भाषा यांची अभिव्यक्ती जनमानसातून दिग्दर्शित होते.
९) विवाहगीते सनातन तरीही नित्य नूतन असते.
१०) विवाहगीतातून भाव—भावना, सुख—दु:ख यांचे प्रगटीवर समाजजीवनातून घडतांना दिसते.

**संदर्भ ग्रथं :—**

१) प्रा. डॉ. मांडे प्रभाकर — लोकसाहित्याचे अंतप्रवाह — गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
२) काळभूण पु.भा — लोकनाटक उद्‌गम व विकास — विजय प्रकाशन.
३) डॉ. कुळकर्णी मदन — महदंबेचे धवळे: संहिता व समीक्षा, पिंपळापूरे प्रकाशन.
४) डॉ. बोरकर हरिश्चंद्र — विवाहगीते व मंगलाष्टके — कोहळी समाजसेवा मंडळ.
५) डॉ. खांदारे साहेबराव — लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग — प्रतिभा प्रकाशन.
६) ढेरे. रा. चि. — प्राचिन मराठीच्या नवधारा — मोघे प्रकाशन, कोल्हापूर.
७) भागवत दुर्गा — लोकसाहित्याची रूपरेषा — पूर्ण वरदा बुक्स प्रकाशने.